Muskan R. Nadaf
Junior Runner Up 1
Matoshree Laxmi Bai High School, Bhavani Peth
Solapur

## “डिजिटल टेक्नोलॉजी: त्यामुळे तुमच्या जीवनात कशी सुधारणा होते? देशाच्या आणि नागरिकांच्या प्रगतीसाठी डिजिटल टेक्नोलॉजीच्या क्षेत्रात काय करण्याची गरज आहे असे तुम्हाला वाटते?”

डिजिटल टेक्नोलॉजी हि एक सर्वात वेगाने वाढणारी संकल्पना आहे डिजिटल टेक्नोलॉजीमुळे संपूर्ण जगात खुप मोठे बदल घडून आले डिजिटल टेक्नोलॉजी आपणास वेगवेगळे टूलस प्रदान करतो ज्यांच्याद्वारे आपण खुप सारी माहिति मिळवू शकतो ........................................................................शकतो तर ती माहिती आपण दुसऱ्या कुठल्याही व्यकतीशी वाटू शकतो उदा. संगणक दूरध्वनी द्वारे. ह्या डिजिटल जगात, जेथे सर्व प्रकारची माहिती जमा केली जाते त्यानंतर, त्या माहितीवर प्रक्रिया केली जाते व पूर्ण जगात ती माहिती प्रसारित करण्यात येते.

संगणक आणि इंटरनेट हे वेगवेगळ्या क्षेत्रात अत्यंत उपयुक्त झाले आहे. दुरसंचार, टेलीविजन, बँकिंग, व्यवसाय, उदयोग, विज्ञान, अनुसंधान व मनोरंजन या सर्व क्षेत्रात डिजिटल टेक्नोलॉजीचा प्रभाव झाला आहे. आणि इतर क्षेत्रात देखील अत्याधीक महत्वपूर्ण कार्य करेल अशी संभावना आहे. सध्या Whats app, facebook, twitter, orkut, hike, etc. अशा वेगवेगळ्या टूलस द्वारे नागरिक एकमेकांसोबत संवाद करू शकतो प्रतिमा, व्हिडिओ, ऑडिओ, इ एकमेकांना पाठवू शकतो.

ई-मेल आणि ई-कॉमर्स सुचना प्राढयोगिकचे नावीन रूप आहे. इंटरनेटच्या द्वारे आपण ह्या सुविधांचा लाभ घेऊ शकतो. ह्या व्यतिरिक्त इंटरनेटवर विभिन्न वेब साईटपासुन आपण आवश्यक माहिति प्राप्त (Download) करू शकतो. डाइरेक्ट टु होम (डी.टी.एच) पद्धत भारतात आली आहे. ह्यामुळे भारतीयांना डिजीटल चैनल पाहण्याची सुविधा प्राप्त होत आहे. इंटरनेटद्वारे अनेक क्षेत्रातील कामें कमीतकमी वेळात करू शकतो अनेक शाळेत किंवा कॉलेजमध्ये विद्यार्थ्यासाठी Online Application form ही सुविधा उपलब्ध आहे. जेणेकरून विद्यार्थी इंटरनेटद्वारे आपल्या आवडीचा कॉलेज निवडून हे Online अर्ज भरुन प्रवेश घेऊ शकतो याना नागरिकांना प्रवास करताना रल्वबद्दल सपूण माहिति काही क्षणात घरि बसून प्राप्त करता येते. ह्यासाठी नागरिकाना www.indianrail.gov.in अशी वेबसाइट प्रदान केली आहे ज्यांचा वापर करुन नागरिक ऑनलाइन आरक्षण, ट्रेन वेळापत्रक, पी.एन.आर स्थिती, स्थान उपलब्धता, भाडे विवारपूस असे अनेक प्रश्नांचे उत्तर मिळवू शकतो.





‘गुगल नक्ष नकाशा’ ही एक अशी सुविधा आहे जी खरोखर अत्यंत उपयोगी आणि अविष्कारशील आहे ह्याचा उपयोग साधारण माणूस जेव्हा प्रवास करत असतो तेव्हा मार्ग व अचूक दिशा पाहण्यासाठी करतो. ह्या नकश्याद्वारे जगात कोठेही सुरक्षित जाणे हे सोइस्कर झाले आहे. ही सुविधा मोबाइलमध्ये उपलब्ध आहे. नागरिक ह्याचा वापर करून आधीच प्रवासाला लागणारा वेळ पाहू शकतो व त्यानुसार प्रवास करू शकतो.

अंतः भारताच्या युवा पिढीने डिजिटल टेक्नोलॉजीमध्ये, (कम्प्यूटरीकरण) अशा क्षेत्रात व्यावसायिक रित्या रुचि घेतली पाहिजे. विद्यार्थ्यानी संगणकज्ञान प्राप्त करून नवीन व उपयुक्त ठरणारे सॉफ्टवेअरस निर्माण केले पाहिजे. जेणेकरून साधारण नागरिकदेखिल ह्या सॉफ्टवेअर चा वापर करु शकेल सॉफ्टवेअरस हे वेगवेगळ्या भाषांना समर्थन केले पाहिजे कारण नागरिकांना खुपवेळा भाषा कळण्यात समस्या येते त्यामुळे जे सॉफ्टवेअर भविष्यात निर्माण होईल ते वेगवेगळया भाषांना Support करतील जेणेकरुण सर्व भारतीय नागरिक त्याचा लाभ घेऊ शकेल.